# श्री संत बापू शामराव अभंगमाला

९८६९
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. 2354



REFBK-0022516
REFBK-0022516

श्री ब्रम्हचारी महाराज, संस्थान रेवसा [विदर्भ]

मूल्य ) ( ५० पैसे

२३५/काव्य
२२५१६
३०११९०८
संदर्भ भेट

॥ ॐ ॥

जय – हरि

रेवसा ( विदर्भ ) निवासी

# श्री संत बापू शामराव अभंगमाला

[ मराठी ]

REFBK-0022516
REFBK-0022516

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२३५ काव्य
दा. क्र. २२५१६
ग्रंथ
शाखा (स्थळ प्रत)

-: संशोधन तिथि :-
मार्गशीर्ष पौर्णिमा
शके १८९०
श्री क्षेत्र कौंडण्यपूर

-: संकलनकार :-
श्री संत अच्युत महाराज
शिवभुवन,
श्री क्षेत्र कौंडण्यपूर
जि. अमरावती (विदर्भ)

# धर्मग्रंथ प्रकाशन मंडळ

श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील

## श्री संत अच्युत महाराज विरचित

श्रीमत् भागवत पुराण, श्रीमहाभारत, दुर्गासप्तशती, भगवद्गीता भावार्थ दर्पण, भजनमाला इत्यादि धर्मग्रंथ साहित्य खरेदी करून धर्मप्रचाराला मदत करा.

### -: पुस्तके मिळण्याची प्रमुख ठिकाणे :-

१) धर्मग्रंथ प्रकाशन, शिवभुवन – श्री क्षेत्र कौंडण्यपूर, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती ( विदर्भ )

२) व्यवस्थापक : सुभाष मुद्रणालय तपोवन – अमरावती.

प्रकाशक

२३५५/का०५
२२५९६
३०१११०८
२+६भ भे

॥ ॐ ॥

जय - हरि

रेवसा ( विदर्भ ) निवासी

# श्री संत बापू शामराव अभंगमाला

[ मराठी ]

REFBK-0022516
REFBK-0022516

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २३५५
२२५९६
शाखा

-: संशोधन तिथि :-
मार्गशीर्ष पौर्णिमा
शके १८९०
श्री क्षेत्र कौंडण्यपूर

-: संकलनकार :-
श्री संत अच्युत महाराज
शिवभुवन,
श्री क्षेत्र कौंडण्यपूर
जि. अमरावती (विदर्भ)

प्रकाशक :

भा. आ. पोतदार
एम. ए. एल् एल् बी. बी. टी.
मु. पो. खोलापूर, ता. जि. अमरावती.

संकलनकार :

श्री संत अच्युत महाराज
श्री क्षेत्र कौंडण्यपूर, ता. चांदूर रेल्वे ( विदर्भ )

सर्व हक्क :

काशीराव राजारामजी वाकोडे,
मु. रेवसा, ता. जि. अमरावती ( विदर्भ )

आवृत्ती :

( प्रथम संस्करण )

प्रती : ५००

मुद्रक :- व. म. गुप्ते, सुभाष मुद्रणालय,
व्यवस्थापक : वि. गो. जोशी ( तिवसकर ) तपोवन--अमरावत

तिथि : पौष वद्य ७
श्री ब्रम्हचारी महाराजांची १०० वी पुण्यतिथी.

मूल्य : ५० पैसे.

# प्रकाशकाचे दोन शब्द

श्री संत शामराव बापू वाकोडे मु. रेवसा यांनी श्री सद्‌गुरु ब्रम्हचारी महाराजांचे चरणी जमीनजुमला व घरदार सर्व अर्पण करून महान संत खरेदी केला. अशा त्या शामराव बापू वाकोडे यांचे कुळांतील त्यांचे नातू श्री. काशीराव राजारामजी वाकोडे यांनी श्री संत शामराव बापूचे हस्तलिखित अभंग सुरक्षित ठेवून संकलन करण्याकरिता श्री संत अच्युत महाराजांचे स्वाधीन केले.

जवळपास १०० वर्षांहून जास्त काळ लोटलेला कागद अगदीच झिरझिरीत झालेला होता, तरी महद्‌प्रयासाने सर्व अभंग-मालेची सांगता लावून श्री संत अच्युत महाराजांनी वेळांत वेळ काढून हे काम पूर्ण केले त्याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत.

हीं अभंगमाला छापण्याचा संकल्प श्री सद्‌गुरु ब्रम्हचारी महाराजांचे शत्‌सांवत्सरीक पुण्यतिथीनिमित्त राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज व ह. भ. प. किसन महाराज खर्डेकर यांच्या उपस्थितीत सत्‌संग मेळावा शके १८८९ साली समाधी मंदीरावर सुंदर रीतीच्या सोहळयांत पार पडला होता. त्या संकल्पाची कार्यपूर्ती श्री सद्‌गुरु ब्रम्हचारी महाराजांच्या १०० व्या पुण्यतिथी निमित्त होत आहे हे पाहून आम्हा श्री सद्‌गुरु ब्रम्हचारी महाराजांच्या भक्तांना अत्यंत आनंद होत आहे.

रेवसा ग्रामाने निर्माण केलेला पांडुरंगाचा निस्सीम भक्त श्री संत शामराव बापू यांचे अभंगाचा गोडवा सर्वांना चाखा-वयास मिळावा व १०० वर्षांहून तसेच पडून राहिलेले साहित्य सर्वांच्या निदर्शनास यावे या शुद्ध हेतुनें आम्ही ही अभंगमाला प्रका-शित करीत असतांना अत्यंत हर्ष होत आहे.

श्री. सद्गुरु ब्रम्हचारी महाराजांच्या भक्तांनी ही सेवा गोड करून घ्यावी असा मनोदय व्यक्त करून श्री सद्गुरुच्या चरणी ही अल्पशी साहित्यसेवा अर्पण करीत आहे.

श्री ब्रम्हचारी महाराजांचा नम्र सेवक

**भा. आ. पोतदार**


दिनांक:–
१–१–१९६९

---

# अनुक्रमणिका


| अ. नं. | | पृष्ठ |
|---|---|---|
| १) | प्रकाशकाचे दोन शब्द | ३ ते ४ |
| २) | अनुक्रमणिका | ४ |
| ३) | अभंग लेखनाचा सुयोग | ५ ते ६ |
| ४) | पश्चात्तापपर अभंग | ७ ते ११ |
| ५) | सगुणपर अभंग | ११ ते १३ |
| ६) | वैराग्यपर अभंग | १३ |
| ७) | भक्तिपर अभंग | १४ ते १५ |
| ८) | आत्मज्ञानपर अभंग | १५ ते १७ |
| ९) | प्रार्थनापर अभंग | १८ ते २२ |
| १०) | समारोपीय अभंग | २३ |
| ११) | आरती श्री बापू शामरावाची | २३ |
| १२) | सुरलोक–महिमा आणि फलश्रुति | २४ |

श्री विठ्ठल-रुख्माई




( श्री शामराव बापू यांचे इष्ट दैवत )

# राष्ट्रसंताच्या स्मृतीस समर्पण



स्व. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

श्री संत अच्युत महाराज



श्री क्षेत्र कौंडण्यपूर, (विदर्भ)

# अभंग लेखनाचा सुयोग

भागवत सप्ताह-प्रवचनाच्या निमित्ताने रेवसा पुण्यक्षेत्री महायात्रेच्या प्रसंगात गेलो असतांना तेथे श्री संत ब्रम्हचारी बाबांच्या अद्‌भुत कथेबरोबर बापू शामरावजीचे नांव मी ऐकले. त्यांचे संत प्रेम, दृढ निश्चय व औदार्य या सद्‌गुणांची जाणीव होताच अशा पुण्य पुरुषाविषयी सहजच श्रद्धा उत्पन्न झाली. संतांचे संकेत विचित्र असतात.

मागच्या वर्षी माझे हस्तलिखित मराठी ओवीबद्ध महाभारत ग्रंथाचा पांच खंडातील प्रथम खंड रेवसा येथे संतसम्मेलन प्रसंगी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे हस्ते प्रकाशित झाला. त्यावेळेस प्रयत्नपूर्वक माहिती मिळवून मी लिहिलेले श्री संत ब्रम्हचारी महाराज यांचे चरित्रहि मराठी ओवीबद्ध प्रसिद्ध झाले.

त्या पोथीत संत खरेदी मथळ्याखाली बापू शामराव यांचा एक अध्याय लिहिण्याचे भाग्य मला लाभले. दिवंगत संतहि मोठे कृपावंत असतात.

श्री संत शामराव बापूच्या घराण्यातील माननीय श्री काशीरावजी पाटील यांनी शामराव बापूचे हस्तलिखित अभंग बरेच दिवसापासून आपल्या संग्रहात ठेवले होते. संताच्या प्रेरणेने काय होणार नाही ? मला त्या हस्तलिखिताचे संशोधन व संग्रहासाठी दान मिळाले. ते काम सारखा प्रवास व कार्यक्रम यामुळे पडून होते. शके अठराशे नव्वदची महायात्रा व भागवत सप्ताह प्रवचनाची तारीख मुक्रर झाली आता हे नियोजित काम केव्हा होणार ?

आज श्री दत्तजयंतीच्या शुभ मूहूर्तावर सतत साडेतीन वर्षापासून चालू असलेले श्री महाभारताचे मराठी ओवीबद्ध लेखन पंच्याणव हजार ओवीत पूर्ण झाले असून त्या आनंदात श्री संत बापू शामराव

यांच्या अभंगमालेच्या संशोधन व संग्रह लेखनाचा शुभयोग आला. जर्जर झालेल्या कागदावर शंभर वर्षापूर्वीचे संताचे हस्तलिखित उदार संतकृपेनेच शोधून त्यांतील शक्य तितक्या अभंगांची बोधाने बहरलेली ही अभंगमाला जनता जनार्दनाचे सेवेला मी वाहत आहे.

काव्य कोणी एकानेच लिहावे असा नियम नसतो. अनेक महापुरुष काव्याच्या आधाराने लोकजागृति करीत असतात 'आधी केले मग सांगितले' असे वागणारे महान संत श्री बापू शामराव यांची अभंगमाला सोप्या शब्दात उत्कृष्ट बोध देणारी आहे. केवळ काव्यशास्त्र न पाहता काव्याचा भावार्थ पाहिला पाहिजे.

श्री. भास्करराव पोतदार, खोलापूर यांनी रेवसा येथे दिलेल्या निमंत्रणामधून संत साहित्यसेवेचा हा लाभ उदयास आला. श्रीमान काशीरावजी यांनी सुरक्षित ठेवलेले संताचे हस्तलिखित उदार मनाने ते मला देवू शकले म्हणूनच संत साहित्याच्या वाक्गंगेचे पवित्र स्नान मला घडले.

समर्थ-संत तुकयाच्या अभंगाप्रमाणे भक्तिज्ञानाची ही अभंग सरिता भाविकांच्या हृदयाचा अवश्य कानोसा घेईल. समुद्रातून वेचलेल्या मोत्याप्रमाणे महदोपदेशाने भरलेली ही अभंगमाला अनेक पारमार्थिक विषयांचे समर्थन करते. असा हा अल्प पण अमूल्य अर्थाने भरलेला अभंगमालेचा संग्रह आहे.

या पुस्तकाचे मुद्रक, प्रकाशक, ग्राहक व आश्रयदाते अशा सर्व धार्मिक सज्जनांना ही अभंगमाला अभंग भक्तीचे सौख्य देवो अशी मी हार्दिक शुभ-कामना करतो.

मार्गशीर्ष पौर्णिमा शके १८९०
शिवभुवन-श्री क्षेत्र कौंडण्यपूर

अच्युत

दा. क्र.
ग्रं शाखा (स्थळ

॥ ॐ ॥

जय विठ्ठल–रुख्माई

# श्री संत बापू शामराव – अभंगमाला

## पश्चात्तापपर -- अभंग

(१)

कैसे देवा ! झाले कर्म हे दुस्तर ?। तुझा काही जोर। न चले गा ! ॥१॥
तुझा मी म्हणवीत प्रारब्ध गवसले। काहीहि न चले। बळ तुझे ॥२॥
मोठी आशा होती तुझ्या चरणाची। आता निराशाची। कळो आली ॥३॥
बापू शामराया आधार तुटला। चिंता हे ानाला। वाटे फार ॥४॥

(२)

आम्हां बाळकासी कंटाळले तुम्ही। तूची माझा स्वामी। देवराया ! ॥१॥
मायबापा सख्या माझ्या लक्ष्मीकांता !। युगाचा रक्षिता। झालासी तू ॥२॥
दीर्घायुषी जन इतर युगाचे। सांभाळले त्यांचे। ब्रीद तुवां ॥३॥
बापू शामराव शतवर्षेवरी। उद्धारशी हरि। कलिमध्ये ॥४॥

(३)

मी अनाथ मी अनाथ। कोण पुरवील मासा हेत ? ॥ १ ॥
दीन हीन मी दुर्बुद्धि। कोण दे मज स्वरूपसिद्धि ? ॥ २ ॥
गरीबाचा आश्रय कोण ?। एका पांडुरंगावीण ॥ ३ ॥
ब पू शामराया कोण तारील ?। गुरु माझा तू विठ्ठल ॥ ४ ॥

(४)

श्री संता विठ्ठलराया !। तुझ्या लागतो मी पाया ॥ १ ॥
न दे शाप पंढरीनाथा। तुझ्या चरणी माझा माथा ॥ २ ॥
शामरायाचा महाराज। माझा नमस्कार तुज ॥ ३ ॥

(५)

जननीपरी त्वां पाळिले । पितयापरी सांभाळिले ॥ १ ॥
अवगुण दोष धुतले । मज पोटाशी धरले ॥ २ ॥
रात्रंदिवस घेतली खबर । आता कां बा धरशी दूर ? ॥ ३ ॥
शामराय मुख न्याहाळी । चरणापाशी गडबडा लोळी ॥ ४ ॥

(६)

कां हो देवा ! ऐसे केले । सुखामध्ये दुःख दिले ? ॥ १ ॥
माझे चित्ती होती आस । आता झाली ती निराश ॥ २ ॥
आधी ठेविले पायापाशी । आता पाठवितो परदेशी ॥ ३ ॥
शामराय लववी माथा । नको पाहू अंत आता ॥ ४ ॥

(७)

मज पाहे मज पाहे । तूच माझी बाप मायं ॥ १ ॥
तूची माझा आप्त सारा । तूची सोयरा धायरा ॥ २ ॥
तूची देव तूची गुरु । तूच रक्षिता तूची तारू ॥ ३ ॥
बापू शामराय सार । तूच एकमात्र आधार ॥ ४ ॥

(८)

दर्शन नको पापिष्ठाचे । निर्मळ मन असो आमुचे ॥ १ ॥
कुटिलाची वार्ता जाण । न आयकोत माझे कान ॥ २ ॥
विषयलुब्ध जे मानसी । न बोलावे मी तयासी ॥ ३ ॥
म्हणे शामराव संगति । फळा येईल शीघ्र अति ॥ ४ ॥

(९)

धिग् त्याचे जिणे आहे । दुष्ट संगति जो राहे ॥ १ ॥
त्यासी घडती सकळ पापे । अधर्म घडतील अमुपे ॥ २ ॥
कुसंगति फळा आली । तुझी पडतसे भूली ॥ ३ ॥
बापू शामराव म्हणे जना । सुसंगतीचा लाभ घ्याना ॥ ४ ॥

(१०)

माझी चिंता तुजवीण। कोण निवारील जाण ॥ १ ॥
तूची माझा हितकर्ता। लक्ष्मीकांत माता पिता ॥ २ ॥
आता मज बा रक्षावे। आपुले भजनासी लावावे ॥ ३ ॥
बापू शामरावासी। ठेवी आपुले चरणापाशी ॥ ४ ॥

(११)

काय जन्मलोसे मूढ ?। हरि मी सावडली बूड ॥१॥
टोंग उपजिले जैसा पोंगा। कांदियाचा पाचोळ्या जोगा ॥२॥
मेरीमध्ये मी उपजलो। उसापोटी कावूस झालो ॥३॥
माय बापाचा प्रताप गातो। मी वायार्थ पाषाण तो ॥४॥
बापू शामराव नमस्कार करी। जहर पाजुनी मज मारी ॥५॥

(१२)

पोटासी अन्न अंगासी वस्त्रा। देसी रुखमाईच्या वरा ॥ १ ॥
सजुनी जैसा नाऱ्या फिरे। मुखी नाम न उच्चारे ॥ २ ॥
सुखासी लोधलो ऐसे। हमाळाचे वृषभ जैसे ॥ ३ ॥
ब्रीद तुझं राख आता। बापू शामराव लववी माथा ॥ ४ ॥

(१३)

तुजवाचुनी देवा कैसे काय करू ?। किती धीर धरू पांडुरंगा ॥१॥
विरक्ताची सांगू किती कर्मकथा। द्यावी रमाकांत भेट तरी ॥२॥
अन्न पाणी खातो रुचि नसे तेथे। तुझे पायी अर्थ गुंतलासे ॥२॥
बापू शामराव तुझा असे दास। सदा मी उदास तुजवीण ॥४॥

(१४)

मजसारखे गुलाम। हरीचे घरी सर्वोत्तम ॥१॥
गेलो आलो मेलो तरी। कोण माझी चिंता करी ? ॥२॥
सेवा करणारे थोर थोर। तेथे काय मी पामर ? ॥३॥
बापू शामराव म्हणे आता। मज पाहे गा दीनानाथा ! ॥४॥

(१५)

नाम जप तप नसे । माझा जन्म व्यर्थ असे ॥ १ ॥
नेणो व्रत नेम धर्म । हीन बुद्धि मी कुकर्म ॥ २ ॥
नसे दया क्षमा शांति । असे क्रोध माझ्या चित्ती ॥ ३ ॥
बापू शामराव अजाण । त्वांच न्यावा उद्धरून ॥ ४ ॥

(१६)

मी अनाथ अनाथ । कोण पुरवील माझा हेत ? ॥ १ ॥
हीन दीन मी कुशल बुद्धि । कोण देयील आत्मसिद्धि ॥ २ ॥
दीनवाण्याचा आश्रय कोण ? । एका पांडुरंगाविण ॥ ३ ॥
बापू शामरावा कोण तारील ?। गुरु माझा हरि विठ्ठल ॥ ४ ॥

(१७)

इकडे ना तिकडे । मध्ये प्रवाहात बुडे ॥ १ ॥
धड संसार ना परमार्थ । अमर्ष पोटी न पुरे ॥ २ ॥
कन्या घरी ना माहेरी । मध्ये राहता नष्ट सारी ॥ ३ ॥
बापू शामरावा ऐसी गति । दया घेयील कां श्रीपति ॥ ४ ॥

(१८)

भक्तीविण जिणे । वृथा शरीर पोषणे ॥ १ ॥
श्वापदे पुष्ट असती । हिंसेने ते पोटे भरती ॥ २ ॥
तैसा नोहे नरदेह । येथे श्रीहरीचे साह्य ॥ ३ ॥
बापू शामराव मना । म्हणे झोपसी कां जना ? ॥ ४ ॥

(१९)

मन गुतोनी पडे फार । वासनात्मक हा संसार ॥१॥
जीव विषयामध्ये गुंतला । नाना व्याधीने जखडला ॥२॥
किंचित् सुख पाहोनी । धावे हा आशा लावुनी ॥३॥
हवेली माडचा खण बांधीत । बापू शामराव बंदिस्थ ॥४॥

(२०)

देवा ! प्रेम देई प्रेम देई । प्रेमावाचुनी गाता लाज ॥१॥
बाळके आईसवे रहावे । भक्ताने हरिसुख भोगावे ॥२॥
सत्य प्रेम नसे चित्ती । कैसे ध्यान कैची मूर्ति ? ॥३॥
बापू शामरावा हरिख । प्रेमावाचुनी नाही सुख ॥४॥

## सगुणपर अभंग

(२१)

यदुकुळी परब्रम्ह । श्रीकृष्ण पुरुषोत्तम ॥१॥
घन:शाम सुंदरकांति । प्रभा फाकली दिव्यमूर्ति ॥२॥
चतुर्भुज पीतांबरधारी । शंखचक्र गदा करी ॥३॥
किरीट कुंडले मकराकार । आभूषणे पाई तोडर ॥४॥
आजानुबाहु कमलनेत्र । दिसतसे तो मनोहर ॥५॥
ब्रम्हमूर्ति श्रीगुरुराज । कार्य कारणाचे बीज ॥६॥
बापू शामराव ध्यातसे । दृष्टिपुढे विठ्ठल दिसे ॥७॥

(२२)

प्रमुख ब्रम्हांडाचा धनी । कटी कर शंखपाणी ॥१॥
परात्पर भक्तिस्तव । पंढरीसी आला देव ॥२॥
क्षीरसागरी लक्ष्मीवर । तो हा उभा विटेवर ॥३॥
सकळ पार्षदाचे सहित । बापू शामरावाचे दैवत ॥४॥

(२३)

अहो ! ब्रम्हांडाचे स्वामी । प्रत्यक्ष यावे देवा तुम्ही ॥१॥
प्रभा पसरली राहे । बिंब क्षीरसागरी राहे ॥२॥
जग मायेने वेडे केले । परब्रम्ह हे दृष्टि आले ॥३॥
म्हणे बापू शामराव । ते जीवाचे जीवन होय ॥४॥

(२४)

श्रीमंता चतुर्भुजा । नमस्कार महाराजा ! ॥१॥
धराधीशा पुरुषोत्तमा । नमस्कार गुणधामा ॥२॥
तू ॐकार राजेश्वर । तुज साष्टांग नमस्कार ॥३॥
बापू शामराव माथा । लववितो पंढरीनाथा ॥४॥

(२५)

मंगळ तू गरुडध्वज । नमस्कार देवा ! तुज ॥ १ ॥
शेषशाई रमारमण । नारायणा ! तुज वंदन ॥ २ ॥
माय बाप लक्ष्मीकांत । तुम्हा माझे दंडवत ॥ ३ ॥
अनंत ब्रम्हांडाच्या नाथा । तुझे चरणी माझा माथा ॥ ४ ॥
देवाधि देवराया । बापू शामराव लागे पाया ॥ ५ ॥

(२६)

ऐसा माझा विठ्ठल स्वामी । मज सुखासी काय कमी ? ॥ १ ॥
स्नेहसूत्रे देवभावे । हरिभक्त होवुनी सेवावे ॥ २ ॥
बापू शामरावा आनंद चित्ती । माझ्या बापाची ही सम्पत्ति ॥ ३ ॥

(२७)

सगुण साक्षात्कार देवुनी मजसी । माय लेकरासी । तैसा भेट ॥ १ ॥
तुवां माझे देवा ! करावे समाधान । द्यावे गा! दर्शन । वेळोवेळा ॥२॥
बापू शामराव मातापित्यावरी । त्याहुनी तुजवरी । करी प्रेम ॥३॥

(२८)

पडला नगरीत दुष्काळ । दामाजीचा हा चोपदार ॥ १ ॥
एकनाथाचे घरी राहुनी । गंध उगाळी चक्रपाणि ॥ २ ॥
नामदेवाचा स्नेह पोटी । बैसुनी सांगाते जेवी ताटी ॥ ३ ॥
बापू शामराव पाहे । विठ्ठल जेथे तेथे आहे ॥ ४ ॥

(२९)

जनी सांगाते आंगबळे । गोवऱ्या वेची विठ्ठल दळे ॥ १ ॥
गोऱ्या कुंभाराची प्रीति । गाढव हांकी आणि माती ॥ २ ॥

नरहरि सोनाराचे सोने । बैसुनी घडवू फुंकू जाणे ॥ ३ ॥
बापू शामराव दास । लोधलासे दर्शनास ॥ ४ ॥

(३०)

भक्त कैवारी गरुडध्वज । श्री वामन महाराज ॥ १ ॥
घनःश्याम दिव्यकांति । अति सुंदर चिमणी मूर्ति ॥ २ ॥
ब्रम्हचर्य धरुनी वेष । देतो भक्तासी संतोष ॥ ३ ॥
बळी पाताळी दडपला । इंद्र स्वर्गासी स्थापिला ॥ ४ ॥
बापू शामरावासी ध्यान । गीता भागवती दर्शन ॥ ५ ॥

## वैराग्यपर अभंग

(३१)

कांही मागत नाही मी तुज । हरि तुझीच आवड मज ॥ १ ॥
अंतरसाक्षी तू असता विठ्ठल । मागावे ते कोणते फळ ॥ २ ॥
बापू शामराव जोडतो कर । तुजविण जीव न राहे स्थिर ॥ ३ ॥

(३२)

निरुपाधि होईल । येणे मोले सुख येईल ॥ १ ॥
निर्मळ होता चित्त । प्रीति पावेल आनंदात ॥ २ ॥
ध्यान स्मरण संकीर्तन । त्यासी देवता प्रसन्न ॥ ३ ॥
बापू शामराव म्हणे कर्म । फळा येतसे तो सत्धर्म ॥ ४ ॥

(३३)

करू संसाराची होळी । घालू देहाची रांगोळी ॥ १ ॥
त्यागू धन मान सम्पत्ति । करू हरि तुझी प्रीति ॥ २ ॥
ये अथवा पुढील जन्मासी । उभे करू दान धर्मासी ॥ ३ ॥
बापू शामरावा ऐसे । वैराग्य द्यावे हृषिकेशे ॥ ४ ॥

(३४)

बहुत अपराध करताती लेकुरे । माय परी धरे पोटासी ती ॥१॥

अपराध केले चौऱ्यांशी कोटि । साठवुनी पोटी तारशी तू ॥२॥
बापू शामराव तुज आठवीन । कुवंडी घालीन जीवनाची ॥३॥

(३५)

ज्ञानदेव रूपा भक्तीच्या स्वामिया । आनंद द्यावया । उल्हासशी ॥१॥
तू आनंदाची मूर्ति आम्ही दुःखी अति । कृपा लक्ष्मीपति करावी हो ! ॥२॥
म्हणे बापू शामराव विठ्ठल हितकर्ता । मी जोडतो हाता पांडुरंगा ! ॥३॥

## भक्तीपर अभंग

(३६)

काय लौकिक अलौकिक । प्राप्ति नाही हरीची एक ॥ १ ॥
गजांतलक्ष्मी राज्यभार । भक्तिवाचुनी नसे उद्धार ॥ २ ॥
स्वर्गवासी जरी झाला । पुण्य सरता उलथा पडला ॥ ३ ॥
बापू शामराव म्हणे भक्ति । देई अखंड फळ प्राप्ति ॥ ४ ॥

(३७)

भागवत संप्रदाय पाहू । येणे मार्गे तरुनी जावू ॥ १ ॥
याच मार्गे गेले थोर । घडे सगुण साक्षात्कार ॥ २ ॥
सगुणाचेनी भव तरू । प्रवृत्ति भेद हा विसरू ॥ ३ ॥
बापू शामरावा आनंद । प्रेमळ भक्तीचा लागो छंद ॥ ४ ॥

(३८)

ऐक माझ्या आत्मारामा । हरिभक्तीचा लागो प्रेमा ॥ १ ॥
करी ऐसे तू साधन । जेणे संतोषे नारायण ॥ २ ॥
बापू शामराव प्रार्थी जीवा । स्मरावे सद्गुरु केशवा ॥ ३ ॥

(३९)

कोण्या जातीचा असो कोणी । परी लागो हरिभजनी ॥ १ ॥
भक्तीला नाही सान थोर । असो चांभार महार ॥ २ ॥
रोहिदास वेश्या गणिका । प्रिय वैकुंठनायका ॥ ३ ॥
बापू शामराव म्हणे भक्ति । तारी कसाब व्याधाप्रति ॥ ४ ॥

(४०)

पतिव्रता स्त्रीचा संसार । भक्तितत्व परमसार ॥ १ ॥
गीता भागवत मतितार्थ । भक्ति विशाल महदर्थ ॥ २ ॥
सकळ ऐश्वर्य सुख सोज्वळ । भक्तिमार्गे फुले फूल ॥ ३ ॥
बापू शामरावा जाणावे । त्वां हि भक्ति मार्गे जावे ॥ ४ ॥

## आत्मज्ञानपर अभंग

(४१)

सर्वामुखी सदुच्चार । बोलवी एक चतुर ॥ १ ॥
चलन चालन उभे बैसतो । मन बुद्धि आत्मा होतो ॥ २ ॥
कर्म करूनी अकर्ता । भोग भोगुनी अभोक्ता ॥ ३ ॥
बापू शामरावा नवल । विश्वाकार आत्मा मंगल ॥ ४ ॥

(४२)

विश्व मायेने वेष्टिले । म्हणोनी निर्गुण कल्पिले ॥ १ ॥
जग समस्त अज्ञान । म्हणोनी उत्पन्न झाले ज्ञान ॥ २ ॥
रात्री अंधार देखिला । म्हणोनी दिवस उदेला ॥ ३ ॥
बापू शामरावा ईश्वर । म्हणुनी माया जगतभर ॥ ४ ॥

(४३)

करू संसारची चांग । जेणे जोडे पांडुरंग ॥ १ ॥
भव दिसता नाश करू । श्रीहरीचे चरण धरू ॥ २ ॥
सद्गुरु तुझे ध्यान ऐसे । शाखेवरी फळ जैसे ॥ ३ ॥
चकोरापरी मन बुद्धि । लक्ष्य लावुनी रूप वेधी ॥ ४ ॥
बापू शामराव म्हणे खरे । युक्ति युक्तीने चालणे बरे ॥ ५ ॥

(४४)

धाव धाव हरि प्रार्थिताहे । वेदोप निषद शास्त्र पाहे ॥ १ ॥
हरिवाचुनी आन नाही । पुराण स्तोत्रे देती ग्वाही ॥ २ ॥
सारासार निवड श्रेष्ठ । नामसंकीर्तन वरिष्ठ ॥ ३ ॥

म्हणोनी करावे कीर्तन । प्रसन्न होतो नारायण ॥ ४ ॥
हे अनुभव ज्ञान अति । बापू शामराव मानी चित्ती ॥ ५ ॥

(४५)

आनंदाची नगरी आनंदाचे घर । आनंदी व्यापार होत असे ॥ १ ॥
ब्रम्ह दृष्टि देता आनंद ये हाता । सत्संग करता लाभ जोडे ॥ २ ॥
बापू शामरावा सद्‌गुरु सधन । त्याचेनी धन गुह्य लाभे ॥ ३ ॥

(४६)

कैसी आंघोळ करणार ? । नदीमध्ये नाही नीर ॥ १ ॥
कैसे सांभाळावे धन ? । धनी जरी बुद्धिहीन ॥ २ ॥
वऱ्हाडणीवरी काय बोल । मुख्य वर्म वधुवराचे ॥ ३ ॥
श्रोते वक्ते करतील काय ? । गुंग बापू शामराव ॥ ४ ॥

(४७)

माझ्या जीवीचा जिवलग । विटेवरी पांडुरंग ॥ १ ॥
सोयरे धायरे सखे आप्त । आई रुख्माई विठ्ठल तात ॥ २ ॥
बापू शामरावा संसार देही । हरिवाचोनी कोणी नाही ॥ ३ ॥

(४८)

आत्माराम राज्य करी हृदयांतरी । आत्मा भूमिवरी बोलतो चालतो ॥ १ ॥
ऐश्वर्य भोगतो परी नाही लिंपित । दूर जवळी स्थित अंतरात्मा ॥ २ ॥
बापू शामराव आत्मध्यान करी । सर्वत्र श्रीहरि एक पाहे ॥ ३ ॥

(४९)

तोची झाला देव तोची झाला भक्त । माझे मनोरथ पूर्ण करी ॥ १ ॥
मज दास करी तू तो हरि । सेवेची चाकरी द्यावी मज ॥ २ ॥
अंतर बाहय तूची सबाहय कोंदला । सगुण भेटला युक्ति हेची ॥ २ ॥
बापू शामराव सौख्याची हे निधि । पावतो त्रिशुद्धि येणे मार्गे ॥ ३ ॥

(५०)

प्रतिबिंब सूर्य प्रमुख ते बिंब । प्रत्यक्ष स्वयंभ । वीटेवरी ॥ १ ॥
आकाशा अवकाश प्राण मारुताचा । देव हो देवाचा । पांडुरंग ॥ २ ॥

अंगी तेज दाटे जीवाचे जीवन । पृथ्वीसी कारण । आधार तो ।। ३ ।।
सकळासी आधार एक परमेश्वर । सर्वत्र श्रीधर । भरलासे ।। ४ ।।
बापू शामरावाचे जीवित गुणाचे । ते गुणातीताचे । कृपादान ।। ५ ।।

(५१)

माझ्या जीवाच्या जीवना तू नारायणा । आकळसी मना तूच एक ।। १ ।।
सूत्रधारी देवा ! सूत्र हे चाळिता । मज बोलविता बाहुल्यासी ।। २ ।।
भाव भक्ति प्रेम देता तूच एक । कर्माकर्म अनेक तुझेचेनी ।। ३ ।।
बापू शामराव काष्ठाच्या समान । चरण लक्षून उभा ठाके ।। ४ ।।

(५२)

बहुत मते झाली ब्रम्हज्ञान मार्गी । भाव पांडुरंगी असो माझा ।। १ ।।
राम लक्ष्मण सीता दिसती अनेक । परी सर्वांतरी एक आत्मीयता ।। २ ।।
संकल्प विकल्प अनेक विकार । ज्ञानाचा सागर उचंबळे ।। ३ ।।
बापू शामरावा विठ्ठलावाचोनी । निश्चय नसे मनी कोणी आन ।। ४ ।।

(५३)

आनंदाची नगरी आनंदाचे घर । आनंदाची व्यापार होई तेणे ।। १ ।।
आनंदी आनंद जेथे नाही खेद । तेथे एक गोविंद भेटतसे ।। २ ।।
बापू शामराव हा तो एक बिंदु । आनंदाचा सिंधु पांडुरंग ।। ३ ।।

(५४)

अन्न वस्त्र त्वांची दिले । लेकरापरी सांभाळिले ।। १ ।।
क्षुधा तृषा जाणली तुम्ही । किती कीर्ति वर्णू स्वामी ।। २ ।।
मज आपुले म्हणविता । कां दूर पाठविता ।। ३ ।।
बापू शामरावे घेतली आळ । तू माझी माय दयाळ ।। ४ ।।

(५५)

लेकरासी माय । दुखविता उचित नोहे ।। १ ।।
मायपणासी लागेल बोल । मी असे अपराधी मूल ।। २ ।।
हीन दीन मी अमंगळ । तुझेचेनी झाला सांभाळ ।। ३ ।।
थोरवीवरी दृष्टि देई । बापू शामरावा पायी ठेवी ।। ४ ।।

## प्रार्थनापर अभंग

(५६)

ज्ञानरूपा देवा । भक्तीच्या स्वामिया । आनंद व्हावया । उल्हासशी ॥ १ ॥
तू आनंदाची मूर्ति । दुःख आम्हा जना । कृपा नारायणा । करावी तुम्ही ॥ २ ॥
म्हणे बापू शामराव । विठ्ठल हितकर्ता । निवारी भव व्यथा । पांडुरंगा ! ॥ ३ ॥

(५७)

कैसे काय करू ? किती पार्थू तुज ?। करुणा माझी आज । नसे तुला ॥ १ ॥
तू मजसी प्रसन्न होशी कोणे युक्ति । मी तो हीनमति । असे देवा ! ॥ २ ॥
भक्तिने करावे स्मरण कीर्तन । नेणो मी स्मरण । मंदबुद्धि ॥ ३ ॥
बापू शामराव करितो विनंति । अगा ! लक्ष्मीपति । आयिकावी ॥ ४ ॥

(५८)

माझिया हृदयी आशा बळकट । विठ्ठलाची भेट । मज व्हावी ॥ १ ॥
इच्छा नसे मज आणीक कशाची । तुझिया चरणाची । आवड मोठी ॥ २ ॥
दयाळा स्नेहाळा करुणाकरा बापा !। सदगुणस्वरूपा !। भेटी मज ॥ ३ ॥
बापू शामराव लागला निजध्यास । अहोरात्र आंस । चरणाची ॥ ४ ॥

(५९)

देई कीर्तनी स्वर प्रेम । जेणे संतोषे पुरुषोत्तम ॥ १ ॥
भाव भक्ति ज्ञान रस । तेणे चित्तासी संतोष ॥ २ ॥
तेव्हा आनंद माझे चित्ती । नाशे जेव्हा अज्ञान मति ॥ ३ ॥
बापू शामराव आनंदे । गातो नाचतो नाना छंदे ॥ ४ ॥

(६०)

मी अनाथ हतबल । दीनवाणा असे निर्बळ ॥ १ ॥
भाव भक्ति ज्ञान वैराग्य । मज कां नसे किंचित् भाग्य ? ॥ २ ॥
श्रवण निजध्यास ध्यान । मज नसे हरीचे स्मरण ॥ ३ ॥
बापू शामराव विनवीतो । शक्ति बुद्धि दे प्रार्थीतो ॥ ३ ॥

(६१)

स्तवन करी प्रेमळ भक्ति । जागृत असताची सुषुप्ति ॥ १ ॥
लंगडा लुळा अंध बहिरा । मुका गुंगा निदसुरा ॥ २ ॥
सद्‌गुरु माझा विठ्ठलराज । माझे वर्तमान पाहो तुज ॥ ३ ॥
टाहो फोडी बापू शामराव । झांपड पडली गवसेना सोय ॥ ४ ॥

(६२)

हरि धाव पाव आता । त्वरे हरी माझी चिंता ॥ १ ॥
वियोग दुःख हे साहीना । संसार दुःखाचा सरेना ॥ २ ॥
आल्या जन्माचे सार्थक । भेट व्हावी तुझी एक ॥ ३ ॥
बापू शामराव म्हणे मरता । नरदेहाविण योनि वृथा ॥ ४ ॥

(६३)

गोवा पडता चौऱ्यांशीचा । मग दुर्लभ नरदेह कैचा ? ॥ १ ॥
हेची पडलीसे खंत । नसे आयुष्य शाश्वत ॥ २ ॥
आई रुखमाई तू विठोबा । येवुनी आश्वासन मज देई बा ! ॥ ३ ॥
बापू शामराव असे बाळ । माय बाप तू दयाळ ॥ ४ ॥

(६४)

किती प्रार्थू तरी महाराज । माझी करुणा नये तुज ॥ १ ॥
तू तो करुणेचा सागर । मज न व्हावे कठोर ॥ २ ॥
तुमचे हृदयी फार दया । मज बिलगली पहा माया ॥ ३ ॥
बापू शामरावाची विनंती । देगा ! दर्शन लक्ष्मीपति ॥ ४ ॥

(६५)

नको अंत पाहू मज बाळकाचा । पिता तू आमुचा । पांडुरंगा ! ॥१॥
तुम्हा अधिकार आम्हासी रक्षावे । क्षमावंत व्हावे । मायबापा ! ॥२॥
लेकुराची जाती असावी जाणीव । माझी जे उणीव । ती पुरवावी ॥३॥
बापू शामराव असावा बालक । तू जगज्जनक । माझा सखा ॥४॥

(६६)

आम्हा देवा ! आता तारी । धरी आपुले तू करी ॥ १ ॥
विषय वासना गांजती । पर्वत धैर्याचा फोडती ॥ २ ॥
नाना मति रसयुक्त । मज गांजिती निःशेष ॥ ३ ॥
बापू शामराव सभीत । उद्धारावे देवा ! त्वरित ॥ ४ ॥

(६७)

काम क्रोधादि मत्सर । मोहाने मी जर्जर ॥ १ ॥
माझा न चले उपाव । विठ्ठलराजा ! तू आता धाव ॥ २ ॥
धाव पाव चक्रपाणि । परोपरी ही विनवणी ॥ ३ ॥
बापू शामराव भ्याला । पांडुरंगा शरण आला ॥ ४ ॥

(६८)

आम्हा आशीष असो तुमचे । तुम्ही सद्‌गुरु आमुचे ॥ १ ॥
आली असता घटी शेवट । तू सखा आमुचा तात ॥ २ ॥
ज्याशी असेल अज्ञान । त्यासी सहज देशील ज्ञान ॥ ३ ॥
बापू शामरावाची विनंति । आशिर्वाद द्यावा माथी ॥ ४ ॥

(६९)

आम्ही सेवक चाकर । सहज धनी तू सावकार ॥ १ ॥
भक्ताचरण हेची प्रभा । देवपणा आली शोभा ॥ २ ॥
आता पित्याहुनी हेत फार । असो माझा तू प्रियकर ॥ ३ ॥
म्हणे बापू शामराव । ऐसे विचार फळावे ॥ ४ ॥

(७०)

माझ्या जीवीच्या जीवना । विटेवरी नारायणा! ॥ १ ॥
अति गुह्य मूळबीज । विठ्ठल हृदयीचे काळज ॥ २ ॥
दारा पुत्राचा मोह न होवो । ध्यानी पांडुरंग राहो ॥ ३ ॥
बापू शामराव आवड हेची । वाढ व्हावी या प्रीतीची ॥ ४ ॥

(७१)

संसाराची नसो चाड । विठ्ठल चरणी असो आवड ॥ १ ॥
असोत नसोत सखे आप्त । हरिचरणाची असो प्रीत ॥ २ ॥
धन मान हे स्वप्नापरी । यांची आवड काय तरी ॥ ३ ॥
बापू शामरावा गोडी असो । तुजवाचुनी आवड नसो ॥ ४ ॥

(७२)

तुमचेवाचुनी देवा ! आवड नसो कोठे । भवभ्रम फिटे । तुझेचेनी ॥१॥
ज्ञानाचा तू दाता भक्तीच्या माहेरा । मोक्षाच्या उदारा । देवराया ॥२॥
तुझे चरणीचा मी घेईन हो छंद । माझी इच्छा गोविंद । पूर्ण करो ॥३॥
बापू शामराव करितो प्रार्थना । अहो नारायणा । उद्धारावे ॥४॥

(७३)

करुणाकर तू दिनानाथ । शरण आलो मी अनाथ ॥ १ ॥
पतितपावना संकटहारी । माझा होई तू कैवारी ॥ २ ॥
क्षमावंत तू कवटाळ । माझा करी गा ! सांभाळ ॥ ३ ॥
बापू शामरावा निजगूज । विठ्ठल हृदयीचे काळज ॥ ४ ॥

(७४)

तुझी आवडी नसे मज । देवा माझी तुज लाज ॥ १ ॥
हा माझा सर्व संसार । असे तुझ्या चरणावर ॥ २ ॥
आपुले इच्छेसी जैसे । द्यावे तुवां फळ तैसे ॥ ३ ॥
मनास येईल तैसे करा । बापू शामरावा पदरी धरा ॥ ४ ॥

(७५)

मन वासना विषय घोळी । भोवरी पडलो भवजळी ॥ १ ॥
बुडतो आता निःशेष देवा । धाव पाव तू केशवा ! ॥ २ ॥
नाका तोंडात जाते पाणी । मज तारी तू चक्रपाणि ॥ ३ ॥
मनोवेगे देवा धाव । बापू शामरावा कंठी जीव ॥ ४ ॥

(७६)

एक मज देवा ! द्यावे । माझी वासना पुरावी ॥ १ ॥
तुझे चरणी माझा हेत । अति निकट ठेवावे ॥ २ ॥
तीन वर्षांचे जैसे बाळ । मायेवाचुनी विव्हळ ॥ ३ ॥
बापू शामराव मागे । येई माये पांडुरंगे ! ॥ ४ ॥

(७७)

भक्तीची गरसोळी बांधियेली गळा । वरील सावळा । ईश्वर तो ॥१॥
भक्तीचे कुंकुम भाळासी लावीन । कांचोळी घालीन । भक्तीची ती ॥२॥
अंतरी वासना वरावे तुजसी । मी तो हृषिकेशी । तुझी प्रिया ॥३॥
बापू शामराव बांधी मंगळसूत्र । भाग्य दे हातात । दयानिधे ! ॥४॥

(७८)

मी असो अनधिकारी । तू तो दयावंत हरि ॥ १ ॥
हीन दीन मी अनाथ । तू म्हणविसी समर्थ ॥ २ ॥
कधी मजवरी होईल कृपा । दयावंता मायबापा ! ॥ ३ ॥
बापू शामराव चरणी आला । माझ्या पोटाची चिंता तुला ॥४॥

(७९)

आला माझा कंटाळा तुज । कैसे करावे महाराज ? ॥ १ ॥
वियोग दुःसह दारुण । तरी कां हे वाचती प्राण ? ॥ २ ॥
कोप न करी पंढरीराया । तुझ्या लागतो मी पाया ॥ ३ ॥
जप करतो श्वासोश्वासें । बापू शामरावा लागले पिसे ॥ ४ ॥

(८०)

देई प्रेम सद्‍गदीत । ध्यान लागावे हृदयांत ॥ १ ॥
मुखी तुझे नाम स्तुति । देई मज सत्संगति ॥ २ ॥
थोर माझा विठ्ठल स्वामी । मज सुखाची काय कमी ? ॥ ३ ॥
बापू शामरावा तुझे प्रेम । भक्तिवाचुनी उगा श्रम ॥ ४ ॥

## समारोपीय अभंग

(१)

अमृतापरी जे अभंग रचले । ते अभंग राहिले । संतकाव्य ॥१॥
बापू शामराव रेवसा निवासी । आले त्यांच्या वंशी । काशीराव ॥२॥
त्यांनी दिले दान जीर्ण अभंगाचे । ऐंशी संख्या त्याचे । शोधले ह ॥३॥
अच्युताने संग्रह करुनी उचित । संतचरणाप्रत । वाहिलासे ॥४॥

(२)

मार्गशीर्ष दत्तजन्म । अठराशे नव्वद शकोत्तम ॥ १ ॥
विदर्भ क्षेत्र कौंडण्यपूर । पुनर्लेखनाचा तो अवसर ॥ २ ॥
संतकृपेचे पाठबळ । तेणे ग्रंथलेखन विपुल ॥ ३ ॥
अच्युत बापू शामरावासी । वंदुनी अर्पी अल्पसेवेशी ॥ ४ ॥

**श्री संतचरणार्पणमस्तु**

## आरती श्री बापू शामरावाची

**(चालः– धन्य हो प्रदक्षिणा)**

आरती ओवाळतो बापू शामरावाला ।
ब्रम्हचारी बाबा ज्याच्या सद्भावासी पावला ॥ धृ. ० ॥
सत्पुरुषाला घर देवोनी , विठ्ठलपंथी लागला ।
गृहस्थ असुनी त्यागी मोठा , कीर्तिध्वज फडकावला ॥ १ ॥
अभंगमाला अभंग ज्याने , लिहिली लोकोद्धाराला ।
जीर्ण कागदावर ती टिकली , शंभर वर्षे जगताला ॥ २ ॥
वेचुनी त्यांतील अभंग काही , देई सज्जन वृंदाला ।
अच्युत वंदी सत्पुरुषाला , जन्म सार्थकी लागला ॥ ३ ॥

## सुश्लोक - महिमा

( वृत्त-भुजंगप्रयात )

गृहस्थाश्रमी भक्त तू विठ्ठलाचा ।
तुझ्या चिंतने नाश होतो भवाचा ।
किती धन्य ते रेवसा पुण्यक्षेत्र ।
जिथे शामरावा ! तुझे सच्चरित्र ॥

( छंदवृत्त : आर्यागीति )

तन मन धन वाहोनी, ब्रम्हचारी प्रसन्न त्वां केला ।
तुझिया काव्याभ्यासें, अच्युत भक्तीरसांबुजी न्हाला ॥

( फलश्रृति )

( छंदवृत्त : आर्यागीति )

वाचावे, ऐकावे, गावे ध्यावे अभंगमालेसी ।
अच्युत म्हणे लाभावे, जन्माच्या सार्थकासि सहजेसी ॥

हरि ॐ तत्सत्

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
REFBK-0022516
REFBK-0022516

## श्री संत अच्युत महाराज
यांची

# ❀ प्रकाशित पुस्तके ❀

| | | |
|---|---|---|
| १. श्री पंचधारा स्तोत्र | मराठी ओवीबद्ध | ००-२० |
| २. श्री कौंडण्यपूर माहात्म्य | ,, ,, | ००-२५ |
| ३. श्री चंद्राजी माहात्म्य | ,, ,, | ००-३५ |
| ४. श्री तात्याजी महाराज चरित्र | ,, ,, | ००-२५ |
| ५. श्रीमत् भगवत्गीता | ,, ,, | ०१-०० |
| ६. श्री संत मायबाई चरित्र | ,, ,, | ००-५० |
| ७. श्री दुर्गासप्तशती | ,, ,, | ०१-२५ |
| ८. श्रीमत् भागवत पुराण | ,, ,, | १८-०० |
| ९. श्री स्वामी रामानंद कथामृत | ,, ,, | ००-६० |
| १०. श्री महाभारत १ (ते ५ खड) | ,, (प्रत्यंकी) | २०-०० |
| ११ श्री सत्यनारायण व्रतकथा | ,, ,, | ००-५० |
| १२. श्री कौंडण्यपूर माहात्म्य | हिंदी | ००-४० |
| १३. स्वानुभव भजनमाला १ | हिंदी व मराठी | ००-५० |
| १४. स्वानुभव भजनमाला २ | ,, ,, ,, | ००-६५ |
| १५. श्री अंबिकोपासना | | ००-०५ |
| १६. श्री गणेश उपासना | | ००-०५ |
| १७. श्रीमत्-भागवत आराधना | | ००-०५ |
| १८. श्री ब्रम्हचारी महाराज चरित्र | | ०२-०० |
| १९. श्री महाभारत-आराधना | | ००-०५ |

२०. गीत भागवत (पद्य) छापत आहे.

धर्मग्रंथ प्रकाशन, शिवभुवन--श्रीक्षेत्र--कौंडण्यपूर,
ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती. (विदर्भ)

## सुश्लोक – महिमा

( वृत्त-भुजंगप्रयात )

गृहस्थाश्रमी भक्त तू विठ्ठलाचा ।
तुझ्या चिंतने नाश होतो भवाचा ।
किती धन्य ते रेवसा पुण्यक्षेत्र ।
जिथे शामरावा ! तुझे सच्चरित्र ॥

( छंदवृत्त : आर्यागीति )

तन मन धन वाहोनी, ब्रम्हचारी प्रसन्न त्वां केला ।
तुझिया काव्याभ्यासें, अच्युत भक्तीरसांबुजी न्हाला ॥

( फलश्रुति )

( छंदवृत्त : आर्यागीति )

वाचावे, ऐकावे , गावे ध्यावे अभंगमालेसी ।
अच्युत म्हणे लाभावे , जन्माच्या सार्थकासि सहजेसी ॥

हरि ॐ तत्सत्

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2359 काव्य
दा. क्र. 22596
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0022516
REFBK-0022516

॥ ॐ स्वस्ति ॥



